# राशिभविष्य - एप्रिल , २०१५ .

## दादा दामले(dadadamle@gmail.com)

### सर्व वाचकांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा !

==========================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल कारण रवि, मंगळ, शनि, हर्शल , नेपच्यून हे महत्त्वाचे दादा ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे शारीरिक कष्ट, दगदग, असह्य मनस्ताप, मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, कुमार्गी मंडळीचा त्रास , अपेक्षाभंग , स्वत:चा हट्टी , हेकट, अहंकारी स्वभाव, त्यामुळे निर्मा ण होणारे शत्रुत्व , आर्थिक समस्या अशापैकी विविध कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळेच शारीरिक अनारोग्यहोणेही संभवते. शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार, नेत्रविकार असे आजार होणे संभवते. जपा. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी अति विचार करू नये, मन सतत शांत ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करावा आणि मनावर संयम ठेवून व सहनशील बनून विपरीत काळाशी मुकाबला करावा असे आग्रहाने सांगणे आहे. तरच गुरु-शुक्रासारख्या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद व सुख अनुभवू शकाल. कौटुंबिक सुख समाधान लाभेल; पण नातेवाईक मंडळीपैकी कोणाकडून असह्य मनस्ताप दिला जाण्याची शक्यता जाणवते. या राशीच्याकाही मंडळीना स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार करणे शक्य होईल. शुक्रामुळे कुटुंबात शुभ घटना घडतील. अर्थलाभ होईल. परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना आर्थिक लाभ होतील. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व मन शांत राहील.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. त्यामुळे नोकरी-व्यवसायात जे काही साधून घेण्याची इच्छा असेल त्यासाठी महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. काही भाग्यवान मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात सतत मनाविरुद्ध घटना घडून मनस्ताप सहन करावा लागण्याचीच शक्यता जाणवते. मित्रांशी वाद, भांडणे टाळा स्वतंत्र व्यावसायिकांच्या व्यवसायात अनिश्चित परिस्थिती निर्माण होणे संभवते. पण द्रव पदार्थांचे व्यापारी, गुप्त पोलीस यांना काळ

अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना काळ लाभदायक होईल. विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. सप्तम स्थानी असलेल्या शत्रुराशीतील शनीमुळे स्वत:च्या किंवा जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, काहींना कुसंगतीमुळे वैवाहिक जीवनातील सुख मिळणे अशक्य होईल. जपा. प्रवास योग येतील. या राशीच्या लेखक-लेखिकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होणे संभवते. पण भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात काही दबलेली जुनी प्रकरणे असतील तर त्यांचा पुन्हा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल व सुखशांतिदायक होईल.

(३) **मिथुन** - या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदारमंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. तसेच शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांनाही काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण या राशीच्या युवकांनी हातचे सोडून नवीन काही करण्याचा विचारही करू नये. आहे तो उद्योगच चालूठेवावा. वैद्यकीय व्यवसाय, औषधविक्रेतेयांना काळ लाभदायक होईल. पण अन्य व्यवसाय असणारांना मात्र अडचणी, अडथळे यांना तोंड देताच काळ व्यतीत करावा लागेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कुटुंबातशुभ घटना घडतील व कौटुंबिक सुखसमाधान लाभेल. काही मंडळीना धनलाभ तर काहींना ऐषआरामाची साधने प्राप्त होणे संभवते. असे असले तरी राहूमुळे गृहसौख्यात बाधा येण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात काही मंडळीना मौल्यवान वस्तूंचा लाभ होण्याची शक्यता जाणवते; तर काहींना परदेशगमनाची संधी प्राप्त होईल असे वाटते. राजकारण, चिकित्सक बौद्धिक क्षेत्र असणारांना कर्तृत्व सिद्ध करण्यास काळ अनुकुल होईल. दमा, अन्य वातविकार असणारांनी विशेष जपावे. अकारण काल्पनिक चिंता करू नये व मनस्ताप करून घेऊ नये. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शारीरिक, मानसिक त्रास होणे संभवते. जपा. श्रद्धा असेल तर गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ पठण करा.

(४) **कर्क** - या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल,

प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात भय, मानसिक ताण , निराशा, मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. जपा. शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात त्रास होणे संभवते. मुलांच्या विविध समस्यांमुळे या राशीच्या मंडळीना अपेक्षित संततिसुख मिळणे शक्य होईलसे वाटत नाही. जपा. गुरु - हर्शल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक कार्यक ्षेत्र असणारांना, शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. पाण्याशी संबंधित जीवन व्यवसाय असणारांनी विशेष जपावे. धोका संभवतो. तसेच विषभयही संभवते. जपा. गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख समाधान व गृहसौख्य लाभेल. हातून उत्तम कामगिरी घडेल पण बंधुसुखात बाधा येणे संभवते. जपा. महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात शनि-मंगळ कुयोगामुळे यांत्रिक तांत्रिक व्यवसाय असणारांना अडचणी, अडथळे सहन करीतच वाटचाल करावी लागेल . पण कला क्षेत्रातील मंडळीना मात्र प्रगती , यश व अर्थलाभ या दृष्टीने काळ खूपच अनुकुल होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांनाअनारोग्य , नैराश्य , अन्य गोष्टींच ामोह आदी कारणांमुळे शैक्षणिक प्रगती करणे कठीण होईल. जपा. श्रद्धेने श्रीगणेश उपासना करा.

(५) सिंह - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडणे, कोणाशी न पटणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, शारीरिक श्रम , कष्ट, दगदग सहन करावी लागणे, राहत्या जागेची समस्या किंवा स्थावरसंबंधी वाद निर्माण होणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप होणे संभवते. त्यात भर म्हणून दाम्पत्य जीवनात दोघांपैकी एकाच्या अनारोग्याची समस्या , मतभेद यांमुळे त्रस्त व्हाल. अशा सर्व ब ाजूंनीप्रतिकुल काळात मना व बुद्धीवर ताबा ठेवून, मौन व्रत धारण करून, सहनशील बनून आध्यात्मिक उपासनेत काळ व्यतीत करा, असे मनापासून आग्रहाने सांगावेसे वाटते. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णतेचे विकार अनारोग्य निर्माण करतील व आगीत तेल ओतल्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. जपा. काही मंडळीना पोटाचे विकार, काहीना मूत्राशय विकार, काहीना त्वचा विकार वा मुखदंत विकार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. जपा. सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहे. नोकरी असो वा व्यवसाय असो, अडचणी, अडथळे, विरोध अशापैकी घटना घडून असह्य मनाताप सहन करावा लागेल. अशा परिस्थितीत संत तुकोबांचे “ महापुरे झाडे जाती, तेथे

लव्हाळे वाचती " हे वचन आठवा आणि नम्रतेने वागा. त्यामुळे होणारा मनस्ताप खूपच कमी होईल. या राशीच्या व्ययस्थानी असलेला उच्च राशीतील गुरु ग्रह आध्यात्मिक उपासनेस अनुकुल आहे. ती उपासनाच सर्व सहन करण्याची शक्ती देईल. श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा " चे पठण करा.

**(६) कन्या** - या राशीच्या मंडळीना या महिन्याच्या काळात शारीरिक-मानसिक अनारोग्याच्या त्रासाबरोबरचगैरसमज , मतभेद, जीवनसाथीचे अनारोग्य अशा कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते. जपा. मन सतत अस्वस्थ राहील. ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी भागीदारीत काहीही कारणाने बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करावा. काही मंडळीना फसवनुकीचा मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. काहींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करील. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शारीरिक कष्ट व दगदग करावी लागल्याने शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकारांचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच काही मंडळीना वातविकारही त्रस्त करतील. शनि-गुरु शुभ योगामुळे या राशीच्या युवकांना मनपसंत अशी नोकरी लागेल किंवा आवडीचे नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्याअनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काहीना भूमिलाभ तर काहीना धनलाभ होणे संभवते. लाभस्थानी असलेल्या उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. अनेक मार्गांनी धनप्राप्ती होईल. विवाहेच्छू युवकयुवतींचे विवाह ठरतील व संपन्न होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती साधणे शक्य होईल. उत्तरार्धात गुरुशुक्र शुभ योगामुळे गुरुकृपा, सुसंगती, कीर्ती , प्रसिद्धी असे काही मिळू शकेल. मन:शांतीसाठी दररोज "बावन्न श्लोकी गुरु चरित्राचे पठण करा.

**(७) तुळा** - या राशीच्या शासकीय, निम-शासकीय सेवेत असणाऱ्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायकहोईल. शास्त्रीय संशोधन क्षेत्र , उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र , शिक्षणक्षेत्र , औषधी संशोधन क्षेत्र अशापैकी कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक , यशदायक व लाभदायक होईल. तसेच अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. पण त्यासाठी शारीरिक-मानसिक -बौद्धिक असे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राखता आले

पाहिजे. कारण या राशीच्या षष्ठ स्थानी असलेले मंगळ व हर्षल अनारोग्यकारक आहेत. त्यामुळे शारीरिक उष्णता भडकणे, अंगावर फोड येणे, इजा होणे, मुदतीचा ताप येणे, डोके दुखणे वा मेंदूविकार बळावणे अशापैकी आजार होणे संभवते. जपा. तसेच काहींना पोटविकार, रक्तविकार वा हृदयविकाराचा त्रास होण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उतरार्धात जीवनसाथीचे आजारपण व अन्य कारणाने गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. कुसंगतीपासून जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. धनस्थानी असलेल्या शत्रू राशीतील शनीमुळे आर्थिक समस्या त्रस्त करतील व कुटुंबात अनिष्ट घटना घडणे संभवते. जपा. व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीच्या काळात अशा सर्व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता असली तरी बुध, गुरु,शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने काही लाभदायक घटनाही घडतील व दिलासा मिळेल. श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक** - स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, नियोजित कार्यात येणारे अडथळे, अडचणी, कुटुंबातील प्रिय जनांचे होणारे स्थलांतर अशापैकी कारणांनी अस्वस्थ व्हाल व गहरे नैराश्य येण्याची दाट शक्यता वाटते. परिवर्तनाचा काळ आहे ही गोष्ट ध्यानात घ्या आणि मनावर ताबा ठेवून आणि सहनशील बनून प्रतिकुल काळास सामोरे जा. कुसंगती व व्यसनाधीनता यापासून जाणीवपूर्वक दूर राहा. घरगुती जीवनात लहानसहान कारणावरूनही कुरबुरी होतील. पण तिकडे दुर्लक्ष करा. महिन्याचा पूर्वार्ध संतती बाबत विविध समस्यांनी हैराण व्हाल. पण मनावर संयम ठेवून आचरण करा. तेच सुखाचे होईल. काही कारणाने प्रिय जनांपासून फारकत होणे संभवते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी विशेष जपावे. लॉटरी, जुगार अशा मोह पडणाऱ्या गोष्टीपासून दूर राहा. नुकसान होण्याचीच शक्यता आहे. नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. गुरु-हर्षल शुभ योगामुळे नोकरीत बढती, वेतनवाढ, उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, गूढ संशोधकाना, कलाकारांना लेखक-कविना या महिन्याचा काळ अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. मात्र चोरी, अर्थहानी , अनारोग्यता यापासून जपावे. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धेने श्रीहनुमान उपासना करा. हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीनी सध्या मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवूनच सतत विनम्रतेचे आचरण करावे, असे स्पष्ट सांगावेसे वाटते. कारण या राशीच्या व्ययस्थानी असलेला शत्रुराशीतील शनि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची दाट शक्यता आहे. विशेष करून आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वकच करावेत. मानसिक ताणामुळे अनारोग्य होणे संभवते. जपा. काहींना अकारण कोर्ट लचांड मागी लागल्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. विशेष करून महिन्याच्या पूर्वार्धात कौटुंबिक जीवनात गैरसमज, असमाधानकारक घटना, वाद, भांडणतंटे अशापैकी कारणांनी कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येण्याची दाट शक्यता आहे. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील तर काहीना स्थावरसंबंधी प्रश्न त्रस्त करतील. त्यामुळे गहरे नैराश्य येऊन अनारोग्य होणे शक्य आहे. जपा. काळ प्रतिकुल आहे ही गोष्ट ध्यानात घेऊन उगीच तक्रारी करत बसू नका. बाहेर फिरताना, वाहने चालवताना सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहे. अशा परिस्थितीतही काही मंडळीना परदेशगमनाची संधी मिळेल. काहीना जलप्रवासाची संधी मिळेल. महिन्याच्या उत्तरार्धात मुलांच्या विविध समस्यांनी त्रस्त व्हाल. जन्मकुंडलीत योग असेल तर या राशीच्या काहींना अचानक धनलाभ वा वारसाहक्काने धनलाभ होणे संभवते. श्रीहनुमान उपासना करा व नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्रांचे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना नोकरी व्यवसायाच्या दृष्टीने महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल असणार आहे. गुरू-हर्षल शुभ योगामुळे उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व कठीण समस्या सोडविण्याची आवड असणारांना काळ यशदायक होईल. महत्त्वाची बाब म्हणजे कोणाला जामीन राहू नका, किंवा कोणाची आर्थिकजबाबदारी स्वीकारू नका. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक व सावधानतेनेच करा. काहींना मनपसंत अशी नोकरी मिळू शकेल; तर काहींना नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. या राशीच्या सप्तम स्थानी उच्च राशीतील गुरु ग्रहामुळे या राशीच्या युवक्युवतीना विवाहयोग संभवतो. तसेच नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध निर्माण होणे संभवते. काहीना धनलाभ होणेही शक्य आहे. तसेच प्रवासयोगही संभवतो. राहूमुळे कौटुंबिक सुखात व संतती सुखात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुख व गृहसौख्य या दृष्टीने काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अनारोग्य, नियोजित कार्यात येणारे

अडथळे, अडचणी, होणारी दिरंगाई, वाढता खर्च , संशय, गैरसमज यांमुळे वाद, भांडणे होणे संभवते. काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रास्त करील. कुटुंबात असमाधानकारक घटना घडतील. त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. अशा परिस्थितीत गुरु-शुक्राच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुक‍ुलघटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

(११) कुंभ - सध्या या राशीच्या मंडळीचे मन अतिशय कोमल झाले असण्याची शक्यता दिसते. त्यामुळे शीघ्र मानसिक संवेदना होत असतील तर थोडे काहीही मनाविरुद्ध घडले तरी लग‍ेचगहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. चंचल मनामुळे नाको ते घडत असण्याची शक्यता वाटते. स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी झाला असण्याची शक्‍यताहीनाकारता येत नाही. ज्यांची या राशीची लहान मुले असतील त्यांनी मुलांच्या आचरणाकडे विशेष लक्ष देणे जरूरीचे होईल. या महिन्यात या राशीच्या मंडळीना आर्थिक समस्या त्रस्त करतील. देणे द्यावेच लाहेल; पण येणे असलेले धन मात्र मिळेल की नाही याची शाश्वती नाही. संतापामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळे, घसा, मान, दाढा यापैकी कसले तरी दुखणे त्रस्त करील. त्यातच भर म्हणून फसवणूक होणे, आप्तेष्टांशी वाद, भांडणे होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थितीत सुधारणा होणे संभवते. धैर्य , हिम्मत वाढेल. नोकरदार मंडळीना वेतनवाढ, बढती, मानाचे स्थान असे काही मिळण्याची शक्यता जाणवते . कर्तृत्व प्रकट ्होईलव वरिष्ठ कौतुक करतील. याच काळात इजा, दुखापत होणे संभवते. जपा. गृहसौख्य लाभेल. शेतीवाडी असणारांना खूप लाभ होईल. सर्व प्रकारचे आरोग्य सुधारेल. पण नोकरीत वाममार्ग धन सहज मिळणार असले तरी तो मोह टाळाच. होत्याचेनव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. शनि-गुरु शुभ योगामुळे चिकित्सक बौद्धिक व्यवसाय, हिशेब, वकिली, सल्लागारी व्यवसाय, कोळसा, लोखंड व्यापारी यांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. श्रद्धा असेल तर हनुमान उपासना अनुकुल होईल.

(१२) मीन - सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असणे संभवते. त्यात कोणी काही उपदेश केला तर असह्य मनस्ताप होत अस‍ावा असेही वाटते. या राशीची लहान मुले तर अतिशय हूड, व्रात्य झाली असण्याची शक्यता जाणवते. पण मनस्ताप, नियोजित कार्यात येणारे अडथळ‍े चिंता यांमुळे अनारोग्य

होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी अधिक जपावे. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्रीग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. नोकरी-व्यवसायास काळ प्रतिकुल असल्यामुळे कष्ट, परिश्रम , दगदग होऊन अनारोग्य होणे संभवते जपा. पण शुक्रामुळे कौटुंबिक सुख लाभेल व मनोनुकुल घटना घडतील. सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. नवे प्रेमसंबंध वा स्नेहसंबंध जुळून येतील. अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या काही मंडळीना दूरचा प्रवासयोग संभवतो. गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगति कारक व लाभदायक होईल. पायी चालताना, वाहन चालवताना सावधानतेने व मन आणि बुद्धीवर ताबा ठेवूनच आचरण करा. अपघात भय संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ पठण करा.

=====ooo0ooo=====